॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215294 E-mail: directorboee@srtmun.ac.in

boeeoffice@srtmun.ac.in

जा.क्र परीक्षा/संपवमुमं/२०२६-२७/ ९८८८ दिनांक : १७/११/२०२६.

प्रति,
**मा.पोलिस अधिक्षक**
पोलिस अधिक्षक कार्यालय
नांदेड/हिंगोली/लातूर/परभणी.

**विषय : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या हिवाळी- २०२६ मध्ये घेण्यात येत असलेल्या पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी परीक्षा केंद्रावर आवश्यकतेनुसार पोलिस बंदोबस्त पुरविणे बाबत.**

महोदय,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयामध्ये हिवाळी- २०२६ च्या घेण्यात येत असलेल्या पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षा दि.१७/११/२०२६ पासुन तर पदव्युत्तर, व्यावसायिक व शिक्षण व शारिरीक शिक्षण अभ्यासक्रमांच्या परीक्षा दि. ०१/१२/२०२६ पासुन तर विधी अभ्यासक्रमांच्या परीक्षा हया दि. ०८/१२/२०२६ परीक्षा सुरु होत आहेत.(विविध अभ्यासक्रमांचे वेळापत्रक सोबत जोडलेले आहे.)

मा. कुलगुरु महोदयांनी मला आदेशीत केल्यानुसार आपणास कळविण्यात येते की, नांदेड, लातूर, हिंगोली व परभणी या चारही जिल्हयातील व शहरातील संलग्नीत विविध महाविद्यालयामध्ये प्रस्तुत विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विविध परीक्षा केंद्रावर परीक्षा घेण्यात येत आहेत. सदरील अभ्यासक्रमनिहाय परीक्षा हया सार्वजनिक सुटटीचे दिवस वगळता प्रत्येक दिवशी दोन सत्रामध्ये (सकाळचे सत्र १० ते १२ व दुपारचे सत्र ०२ ते ०५ वाजेपर्यंत) घेण्यात येत आहेत. या चारही जिल्हयामध्ये काही परीक्षा केंद्र हे अतिसंवेदनशील आहेत. परीक्षा केंद्रावर नियुक्त केलेले सहकेंद्रप्रमुख/दक्षतापथक यांना अनेक वेळेस धमकावणे,धक्काबुक्की करणे, आडवुन मारहान करणे, त्यांच्या गाडयांची तोडफोड करणे, परीक्षा केंद्रावर कॉपी गरणे, गैरमार्गाचा वापर करुन अनुचित प्रकार करणे इ. प्रकार होत असतात, यासाठी महाराष्ट्र ॲक्ट १९८२ अन्वये परीक्षा केंद्रावर अनुचित प्रकार करणे, कॉपी करणे व गैरमार्गाचा अवलंब करणे इ. बाबीसाठी भा.द.वि नुसार विविध गुन्हे दाखल करण्यासंदर्भात तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

परीक्षा पारदर्शी व कॉपीमुक्त वातावरणामध्ये पार पाडण्यात यावेत व परीक्षेचे पावित्र्य जपण्यात यावे व कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावा, यासाठी आपल्या सहकार्याची प्रस्तुत विद्यापीठास अत्यंत आवश्यकता आहे.

सबब, आपणास विनंती करण्यात येते की, यापत्रासोबत जोडण्यात आलेली परीक्षा केंद्रसूची व वेळापत्रकाचे अवलोकन व्हावे व त्याप्रमाणे आपल्या अधिपत्याखालील पोलिस ठाणे प्रमुख यांना सूचना व आदेशीत करुन त्या त्या परीक्षा केंद्राच्या आवश्यकतेनुसार व त्यांचे मागणीनुसार पोलिस बंदोबस्त पुरविण्यात यावा, जेणेकरुन परीक्षेत गैरप्रकार व अनुचित प्रकार होणार नाही.

करीता पुनश्चः विनंती की, सदर परीक्षा केंद्रावर बंदोबस्त देवुन या पवित्र अशा शैक्षणिक कार्यास सहकार्य करावे, हि विनंती.

आपला विश्वासु,

**(हुशारसिंग साबळे)**
प्र-संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ.

**सोबत :**
१.परीक्षा केंद्र सूचीची प्रत.
२.परीक्षेच्या वेळापत्रकाची प्रत.

**प्रत योग्य त्या आदेशास्तव सविनय सादर :**
मा.पोलिस उपमहानिरीक्षक,नांदेड परिक्षेत्र,
विशेष पोलिस महानिरीक्षक कार्यालय, महात्मा बसवेश्वर चौक,नवीन कौठा
सिडको रोड, नांदेड - ४३१६०३.

**प्रत माहितीस्तव सादर :**
मा.कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा.प्र-कुलगुरु महोदय,प्रस्तुत विद्यापीठ.
सर्व प्राचार्य/केंद्रप्रमुख,हिवाळी- २०२६ परीक्षा केंद्र,नांदेड, परभणी, हिंगोली व लातूर जिल्हयातील सर्व परीक्षा केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ : यांना देवुन कळविण्यात येते की, हिवाळी २०२६ परीक्षेदरम्यान परीक्षा केंद्रावर पोलिस बंदोबस्ताची आवश्यकता असल्यास संबंधीत पोलिस स्टेशनशी संपर्क करुन पोलिस बंदोबस्ताची मागणी करावी.